कृषी उन्नती योजना - राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानांतर्गत वाणिज्यिक पिकाकरिता (कापूस) सन २०१७-१८ चा अखर्चित ₹७.५१ लाख निधी पुनर्जिवित करून सन २०१८-१९ मध्ये अभियानांतर्गत अनुसूचित जाती प्रवर्गासाठी विनियोगात आणण्यास मान्यता प्रदान करणे.

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांक : असुअ-२०१८/प्र.क्र.८६/४-अे
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १८ मार्च, २०१९

संदर्भ:-

१. वित्त विभागाचे परिपत्रक क्र. अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३ दि. ०२/०४/२०१८
२. कृषी व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३१/१७-अे,दि.१९/०४/२०१७
३. कृषी व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र. ०४१८/प्र.क्र.१५५/१४-अे, दि.२७/०४/२०१८
४. कृषि, सहकार व शेतकरी कल्याण विभाग, कृषि व शेतकरी कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र. No.२-९/२०१५ –CU-IV दि. ०३.०५.२०१८
५. कृषी आयुक्तालयाचे दि.२१.०५.२०१८ चे ई-मेल
६. कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र. अेअेपी-२०१८/प्र.क्र.४६ /४-अे, दि.२३/०५/२०१८
७. कृषि, सहकार व शेतकरी कल्याण विभाग, कृषि व शेतकरी कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र. No.२-९/२०१५ –CU-IV दि.१२.०६.२०१८
८. कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र. असुअ-२०१८/प्र.क्र.७८ /४-अे, दि.२४/०७/२०१८
९. कृषी आयुक्तालयाचे पत्र क्र.विप्र३/राअसुअ(ऊस)/१८१९/अनु.वा/३११८/४४१/१८, दि.४/८/२०१८
१०. कृषि व पदुम विभाग शासन शुध्दीपत्रक क्र. अेअेपी-२०१८/प्र.क्र.४६ /४-अे, दि.२१/०८/२०१८
११. कृषी आयुक्तालयाचे पत्र क्र.कृआ/विप्र३/राअसुअ/उविका१८-१९/४/१८, दि.०२/०१/२०१९
१२. कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र.पुनर्वि-२०१८/प्र.क्र.११२(४)/१८/२-अे, दि.१५/०३/२०१९

प्रस्तावना:-

सन २०१८-१९ करीता केंद्र शासनाने संदर्भांकित दि.०३/०५/२०१८ रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्राकरिता राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान वाणिज्यिक पिकांकरीता (कापूस, ऊस) ₹७९३.२७ लाख निधीचा (केंद्र हिस्सा ₹ ४७५.९६ लाख + राज्य हिस्सा ₹ ३१७.३१ लाख) कृती आराखडा मंजूर केला आहे व त्यास शासनाने संदर्भांकित दिनांक २३/०५/२०१८ व दिनांक २१/०८/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे.

सन २०१५-१६, सन २०१६-१७ व सन २०१७-१८ मध्ये कापूस पिकासाठी केंद्र हिस्स्याच्या स्वरुपात प्राप्त झालेल्या निधीच्या अनुषंगाने राज्य शासनाने केंद्र शासनास सादर केलेल्या अंतरिम उपयोगिता प्रमाणपत्रानुसार एकूण ₹७३.२० लाख निधी अखर्चित होता सबब, केंद्र शासनाने संदर्भाधीन दि. १२ जून, २०१८ च्या पत्रान्वये तिन्ही वर्षाचा मिळून अखर्चित असलेला एकूण ₹७३.२० लाख निधी पुनर्जिवित करुन सन २०१८-१९ मध्ये विनियोगात आणण्यास मंजूरी दिली आहे. तथापि, राज्य शासनाने केंद्र शासनास सादर

केलेल्या अंतिम उपयोगिता प्रमाणपत्रानुसार एकूण ₹७२.७६ लाख निधी अखर्चित असून (सर्वसाधारण - ₹६१.१५ लाख, अनुसूचित जाती - ₹५.४७ लाख, अनुसूचित जमाती - ₹६.१४ लाख) तो पुनर्जिवित करुन सन २०१८-१९ मध्ये विनियोगात आणण्यासाठी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

सन २०१८-१९ करिता राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान वाणिज्यिक पिकांकरीता (कापूस) पिकाकरिता केंद्र शासनाने एकूण ₹३५४.५५ लाख (केंद्र हिस्सा ₹२१२.७३ लाख + राज्य हिस्सा ₹१४१.८२ लाख) निधीचा वार्षिक कृती आराखडा मंजूर केला असून त्यापैकी अनुसूचित प्रवर्गासाठी राबवावयाच्या कार्यक्रमासाठी पुढीलप्रमाणे ₹३६.१६ लाख निधी मंजूर आहे -

(₹ लाखात)

वर्ष	**अनुसूचित जाती प्रवर्गासाठी मंजूर कृती आराखडा**		**एकूण**
	केंद्र हिस्सा	**समरूप राज्य हिस्स्याचा निधी**	
मागील वर्षांचा अखर्चित (पुनरुज्जीवित) निधी	५.४७	३.६५	९.१२
सन २०१८-१९ मध्ये प्राप्त होणारा निधी	१६.२३	१०.८२	२७.०५
एकूण	**२१.७०**	**१४.४७**	**३६.१७**

सन २०१८-१९मध्ये केंद्र शासनाने राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानातंर्गत वाणिज्यिक पिकांपैकी कापूस पिकाकरिता पहिला हप्त्यात केंद्र हिस्स्याचा ₹८.८१ लाख निधी वितरीत केला आहे व त्या समरुप राज्य हिस्स्याचा ₹५.४७ लाख असा एकूण ₹१४.६८ लाख निधी प्राप्त झाला आहे. त्याशिवाय मागील वर्षाचा पुनरुज्जीवित निधीसह, चालू वर्षी केंद्र हिस्स्याकरिता ₹१४.२८ लाख (₹८.८१ लाख + ₹५.४७ लाख) व त्या समरूप राज्य हिस्स्याकरिता ₹९.५२ लाख (₹५.८७ लाख + ₹३.६५ लाख) असा एकूण ₹२३.८० लाख निधी वितरणासाठी प्राप्त झाला आहे.

चालू वर्षी सदर योजनेकरिता प्राप्त एकूण ₹२३.८० लाख निधीच्या अनुषंगाने उपलब्ध अर्थसंकल्पिय तरतुदीच्या मर्यादेत एकूण ₹९.०० लाख निधी (केंद्र हिस्सा ₹५.४० लाख + राज्य हिस्सा ₹३.६० लाख) संदर्भ क्र. ८ येथील शासन निर्णयान्वये वितरीत केला असून केंद्र हिस्स्याच्या ₹१.५९ लाख व राज्य हिस्स्याच्या ₹५.९२ लाख अशा एकूण ₹७.५१ लाख निधीचे वितरण बाकी आहे. या उर्वरित ₹७.५१ लाख निधीच्या वितरणासाठी कमी पडणारी अर्थसंकल्पिय तरतूद राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानांतर्गत अन्नधान्य पिकांच्या लेखाशिर्षाखालील संभावित बचतीच्या निधीतून संदर्भ क्र.१२ येथील शासन निर्णयान्वये पुनर्विनियोजनाद्वारे उपलब्ध करुन दिली आहे, सदर निधीच्या वितरणाबाबत शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे:-

शासन निर्णय:-

१. सन २०१७-१८ अखेर राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानांतर्गत वाणिज्यिक पिके (कापूस) करिता अनुसूचित जाती प्रवर्गासाठी प्राप्त केंद्र हिश्श्याच्या निधीपैकी अखर्चित असलेला **केंद्र हिश्श्याचा ₹१.५९ लाख व राज्य हिश्श्याचा ₹५.९२ लाख असा एकूण ₹७.५१ लाख निधी (रुपये सात लाख एकावन्न हजार फक्त)** पुनर्जिवित करुन सन २०१८-१९ मध्ये सदर अभियानांतर्गत कापूस पिकाकरिता अनुसूचित जाती प्रवर्गासाठी विनियोगात आणण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२. परिच्छेद-१ मध्ये अन्वये पुनर्जिवित केलेल्या **₹७.५१ लाख निधीपैकी केंद्र हिश्श्याचा ₹१.५९ लक्ष निधी (रुपये एक लाख एकोणसाठ हजार फक्त) व राज्य हिश्श्याचा ₹५.९२ लक्ष निधी (रुपये पाच लाख ब्याण्णव हजार फक्त)** आयुक्त (कृषि)यांना अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीद्वारे वितरीत करण्यात येत असून तो सन २०१८-१९ मध्ये पुढील लेखाशिर्षांतर्गत अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या तरतुदीतून खर्ची टाकावा:

केंद्र हिस्सा	राज्य हिस्सा
मागणी क्रमांक डी-३ २४०१- पीक संवर्धन १०८, वाणिज्यीक पिके (००) (७८९)-अनुसूचित जाती उपयोजना, (०१) (०९) राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान- कापूस (केंद्र हिस्सा ६०%) (केंद्र पुरस्कृत योजना) (२४०१A२०७) (योजनांतर्गत) (दत्तमत) ३३, अर्थसहाय्य	मागणी क्रमांक डी-३ २४०१- पीक संवर्धन १०८, वाणिज्यीक पिके (००) (७८९)-अनुसूचित जाती उपयोजना, (०१) (१०) राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान- कापूस (राज्य हिस्सा ४०%) (केंद्र पुरस्कृत योजना) (२४०१A२१६) (योजनांतर्गत) (दत्तमत) ३३, अर्थसहाय्य

३. या शासन निर्णयान्वये राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानांतर्गत वाणिज्यिक पिके (कापूस) करिता उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या केंद्र व राज्य हिस्याच्या **₹७.५१ लाख** रक्कमेचे जिल्हा निहाय/ कार्यालय निहाय वाटप करण्याकरिता संचालक (विस्तार व प्रशिक्षण) यांना प्राधिकृत करण्यात येत असून अभियानांतर्गत वितरीत निधी PFMS प्रणालीद्वारे खर्ची टाकावा.

४. सदर निधी खर्च करताना संदर्भाधीन अ. क्र.६ येथील दि. २३ मे, २०१८ च्या शासन निर्णयातील अटी, शर्ती व कार्यपद्धतीचे पालन करण्यात यावे.

५. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.५९/२०१९/व्यय-१, दि.६ मार्च, २०१९ अन्वये दिलेल्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचे सांकेतांक २०१९०३१८१२३३३५७४०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Shrikant Chandrakant Andge

Digitally signed by Shrikant Chandrakant Andge
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5d5ab93b4e4f2fcd87e12fe19b8965025d482b1bee0fffaa62085c34db6bfd8c, serialNumber=d8d9626c9e038380cd235c048f20d7ce74cffd3a95f2ac3c192e9c991f358271, cn=Shrikant Chandrakant Andge
Date: 2019.03.19 10:51:18 +05'30'

(श्रीकांत आंडगे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१) मा. मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

२) मा. राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

३) मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा, विधानमंडळ, मुंबई.
४) मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, विधानमंडळ, मुंबई.
५) सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे (५ प्रती)
८) संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, पुणे
९) सर्व जिल्हाधिकारी,
१०) सर्व विभागीय कृषि सहसंचालक
११) सर्व जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी
१२) सर्व कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद
१३) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१४) सर्व मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद
१५) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ, शास्त्रीनगर, अकोला.
१६) सह संचालक लेखा व कोषागरे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय भवन, पाचवा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई
१७) महालेखापाल (लेखा व अनुज्ञयेता / लेखा परिक्षा) महाराष्ट्र १ /२, मुंबई / नागपूर
१८) महालेखाकार (स्थानीय निकाय लेखापरिक्षा व लेखा), प्रतिष्ठा भवन ,१०१ महर्षी कर्वे मार्ग, मुंबई-४०० ०२०
१९) नियोजन विभाग (कार्यासन - १४३१ / कार्यासन - १४४४), मंत्रालय, मुंबई - ३२
२०) वित्त विभाग (व्यय-१) /अर्थसंकल्प -१३), मंत्रालय, मुंबई - ३२
२१) निवडनस्ती (कार्यासन-४अे).